'सहयोगी प्राध्यापक सुक्ष्मजीवशास्त्र' या
पदाची दि.०१/०१/२०२५ रोजीची तात्पुरती
सेवाज्येष्ठतायादी प्रसिध्दीबाबत...

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी ४११ ०१८**
**क्र.साप्रवि/१२/कावि/३२ /२०२५**
**दिनांक ०८/०७ /२०२५**

वाचले क्र. १) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र क्र. एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२८१, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २१/०६/२०२१
२) नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.पीसीसी-३०१३/प्र. क्र.११/नवि-२२ दि.०४/०३/२०१४
३) अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/०२/कावि/५४५/२०२० दि. २७/१०/२०२०
४) सामान्य प्रशासन विभागाकडील दि. ०८/०७ /२०२५ चा मान्य प्रस्ताव

**आदेश**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर **'सहयोगी प्राध्यापक सुक्ष्मजीवशास्त्र'** पदावर दि. १८/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२४ या कालावधीत नियमित नियुक्त, पदोन्नत झालेल्या अधिकाऱ्यांची दि.०१/०१/२०२५ रोजीची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी या आदेशान्वये प्रसिध्द करण्यात येत आहे. त्यानुसार –

१) दि.०१/०१/२०२५ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतायादीमधील नमुद अधिकाऱ्यांनी स्वतःचे नावाबाबत, प्रवर्ग, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता, रुजू तारीख, जेष्ठता क्रम, नियुक्तीचा मार्ग, सेवानिवृत्ती दिनांक अथवा ज्येष्ठतायादीमध्ये नाव नसलेबाबत काही आक्षेप असल्यास त्याबाबत आपला आक्षेप लेखी निवेदन सादर करून ही तात्पुरती ज्येष्ठतायादी प्रसिध्द झाल्यापासुन **१५ दिवसाचे** आत संबंधित शाखाप्रमुखांच्या शिफारसीसह सामान्य प्रशासन विभागात योग्य त्या पुराव्यासह सादर करावा.
२) आक्षेपासंदर्भातील योग्य ते पुरावे सत्यप्रती करुन सादर न केल्यास व निश्चित केलेल्या १५ दिवसांचे मुदतीत आक्षेप सामान्य प्रशासन विभागात प्राप्त न झाल्यास सदरचे आक्षेप फेटाळण्यात येतील. तसेच दप्तरी दाखल केले जातील, याची स्पष्ट नोंद घ्यावी.
३) सर्व शाखाप्रमुखांना कळविण्यात येते की, ही तात्पुरती ज्येष्ठतायादी त्यांनी त्यांच्या विभागातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ बजावुन त्यांना प्रत मिळालेबाबत दिनांकीत **स्वाक्षांकित पोहोच** ८ **दिवसाचे आत** सामान्य प्रशासन विभागास सादर करावी. तसेच त्यांनी सदर ज्येष्ठतायादी त्यांच्या कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्द करावी.
४) संबंधित अधिकाऱ्यांनी सादर केलेले आक्षेप शाखाप्रमुखांनी स्वयंस्पष्ट शिफारसीसह / अभिप्रायासह व अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या पुराव्यांची खातरजमा करूनच आवश्यकता असल्यास सेवानोंद पुस्तकातील नोंदीसह सर्व पुरावे सत्यप्रती करून मुदतीत सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावे.
५) तात्पुरती ज्येष्ठतायादी प्राप्तच झाली नाही, किंवा मुदतीत आक्षेप सादर करूनही शाखाप्रमुखांनी मुदतीत आक्षेप सामान्य प्रशासन विभागाकडे सादर न केल्यास अंतिम सेवाज्येष्ठतायादी प्रसिध्दीनंतर काही वाद निर्माण झाल्यास याबाबतची संपुर्ण जबाबदारी शाखाप्रमुखांची राहील.
६) या तात्पुरती सेवाज्येष्ठतायादीत काही वास्तविक चुका असल्यास उदा. नाव समाविष्ट नसणे, आडनावात/ आद्याक्षरात/ जन्मतारखेत चुका आढळुन आल्यास त्या शाखाप्रमुखांनी निदर्शनास आणाव्यात, म्हणजे ज्येष्ठतायादी अंतिम करताना त्या दुरूस्त करण्यात येतील.
७) तात्पुरती ज्येष्ठतायादी वाचले क्र. १ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियम २०२१ दि.२१ जुन २०२१ मधील तरतुदींच्या अनुषंगाने तयार केली आहे.
८) तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी मे.न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवरील निर्णयामुळे पुर्वीची अथवा या सेवाज्येष्ठतायादीत बदल करावा लागेल, त्या निर्णयाच्या अधिन राहुन असेल.

(विजयकुमार खोराटे)
अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

प्रतः- संबंधित विभाग

२/- सदर आदेश व सेवाज्येष्ठतायादी मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून सदरची प्रत संबंधित कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणुन द्यावी.

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त, सामान्य प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411 018

## सहयोगी प्राध्यापक सुक्ष्मजीवशास्त्र पदाची दि.01/01/2025 रोजीची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी

पे लेवल :- S-13 A वेतनश्रेणी :- 131400 - 217100

| अ.क्र. | संगणक क्रमांक | अधिकाऱ्याचे नाव | प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | सहयोगी प्राध्यापक सुक्ष्मजीवशास्त्र पदावरील रुजू दिनांक | नियुक्तीचा मार्ग (पदोन्नती/ सरळसेवा) | मनपामध्ये कामास लागलेचे | | सेवानिवृत्ती दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | पद | तारीख | | |
| 1 | 13018 | मुडशिंगकर स्वाती शंकरराव | खुला | एम.बी.बी.एस., एम.एस.सी.आय.टी. एम.डी. | 04/04/1979 | 18/01/2021 | सरळसेवा | सहयोगी प्राध्यापक सुक्ष्मजीवशास्त्र | 18/01/2021 | 30/04/2037 | |

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त, सामान्य प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 411 018

(विजयकुमार खोराटे)
अतिरिक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 411 018